# अनुसूचित जाती व जमाती विषयक राज्यघटनेतील तरतुदी: सामाजिक, आर्थिक व राजकीय परिणामांचा अभ्यास

**सह. प्रा. एम. एस. देशमुख**

कै. सौ. कमलताई जामकर
महिला महाविद्यालय परभणी

**सारांश:**

"मनातून जात नाही ती जात" अशी सोप्या भाषेत व्याख्या *बाबा महाराज सातारकर* यांनी केली. भारतीय वर्णव्यवस्थेनुसार, चार वर्ण आहेत ब्राम्हण हे ज्ञानदानाचे कार्य करणारे, वैश्य व्यवसाय करणारे, क्षत्रिय रक्षण करणारे व शेवटी शुद्र गुलामगिरी करणारे अशा पध्दतीने मानवतेला कंलक लावणारी वर्णव्यवस्था अस्तित्वात होती आणि आजही थोड्या फार प्रमाणात अस्तित्वात आहे.

भारतीय समाज हा विविध जाती, धर्म, भाषा व संस्कृतीने, विविधतेने नटलेला देश असला तरी, यामध्ये काही वर्ग शतकानु शतके सामाजिक ,आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास राहिले. विशेषत:अनुसुचित आती व जमाती या वर्गांना समाजातील मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाची भारतीय संविधानात विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत, या तरतुदींचा प्रमुख उद्देश म्हणजे सामाजिक न्याय प्रस्थापित करणे, समान संधी देणे आणि न्याय प्रशोषणमुक्त समाजाची उभारणी करणे होय.

भारतीय राज्यघटनेतील अनुसुचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी असलेल्या तरतुदींचा त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनावर सकारात्मक प्रभाव पडतो. या तरतुदीमुळे त्यांना शिक्षण, नोकरी,राजकीय प्रतिनिधित्व आणि इतर सामाजिक योजनांमध्ये आरक्षण आणि विशेष अधिकार मिळतात, ज्यामुळे त्यांच्या जीवनात सुधारणा होत आहेत.

**प्रस्तावना:**

जाती व्यवस्था हा सामाजिक स्तरीकरणाचा प्रकार भारतीय समाजात आढळून येतो. काही वर्षापूर्वी व्यकतीच्या जीवन पद्धतीवर व सामाजिक वर्तनावर जाती व्यवस्थेचे कठोर नियंत्रण असल्याचे दिसते परंतु हे स्वरूप आता हळूहळू बदलताना दिसत आहे. जातीव्यवस्थेची बंधने पूर्वी इतकी कठोर किंवा कडक स्वरूपाची राहिली नाहीत. व्यक्ती-व्यक्ती मधील रोटी-बेटी व्यवहार, सामाजिक संपर्क इ बाबत जाती व्यवस्थेची बंधने शिथिल झालेली आहेत. अशे अनेकाविध बदल होत असले तरी जाती व्यवस्था आजही आपले अस्तित्व राखून आहे. म्हणूनच सामाजिक स्तरीकरणाचा एक प्रकार व्यवस्था महत्वाची मानली प्रकार म्हणून जाती व्यवस्थेला तडा देण्याचे कार्य राज्यघटनेतील तरतुदींनी चांगल्या प्रकारे केले आहे. जसे की कलम 14 कायद्यापुढील समानता.

आज भारतात जवळपास 6000 जाती आहेत असा अंदाज व्यक्त केला जातो. भारतातील जातीचा व त्याचबरोबर अनुसुचित जातीचा अभ्यास महत्वाचा ठरतो. हिंदू समाज व्यवस्थेचा प्रमुख आधार हा जातीव्यवस्था मानला जातो.

पारंपारिक दृष्टीकोनातून शुद्रांना untouchable समजले आहे. परंतू घटनेने सर्व जाती-जमातींना समानतेच्या पातळीवर आणण्यासाठी खूप मोठे कार्य केले आहे. याचा परिणाम असा की अनुसुचित्त जाती व जमातीच्या प्रगतीमध्ये हातभार लागत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात पारंपारिक जाती व्यवस्थेत अस्पृश्य जातीवरील निर्बंध कायादयामुळे कमी

झालेले आहेत, अनुसुचित जाती व जमातील घटनेतील तरतुदींचा सामाजिक व आर्थिक जिवनावरील अभ्यास करताना सुरुवातीस अपृश्यत्तेचा अर्थ पाहुया.

**अपृश्यतेचा अर्थ-**

डॉ बाबासाहेव ओबेडकरांनी भारतातील अपृश्यता ही एक विचित्र घटना आहे. इतर भागातील मानवतेने ही समस्या कधीच अनुभवली नाही" असे म्हटले आहे.

अस्पृश्यता म्हणजे कोणत्याही सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय अधिकारापासून वंचित ठेवणे व नंतर मानवतेच्या खालच्या वर्गाशी स्पर्श करणे, पालनपोषण करणे किंवा स्थायिक होण्यास अपात्र करणे होय.

**अनुसुचित्त जाती व जमाती-व्याख्या**

"अनुसूचित जाती व जमाती म्हणजे भारतीय राज्यघटनेने अधिकृत ओळखलेले आणि मागासले मानलेले सामाजिक गट होय. "

अनुसुचित्त जाती शब्दाचा उगम व विकास- भारतीय समाजाची विभागणी असंख्य जातीमध्ये झालेली आहे. काही अभ्यासकांच्या मते ऋग्वेद काळी अस्पृश्य होते त्यांना शुद्र म्हणत, ब्राम्हण ग्रंथात शुद्रांना 'दास' म्हणून संबोधले जाई, सुत्रकाळात अपृश्यता दृढ झाली. त्यांच्यावर अनेक बंधने टाकण्यात आली, स्मृतीकाळात शुद्रवर्गाचा निर्देश आला असून त्याच्या आचरणाचे कठोर नियम सांगितले आहेत,मनुस्मृतीमध्ये अस्पश्यतेसंबधीचे कठोर नियमांची सूची दिलेली आढळते. कौटिल्याचे अर्थशास्त्रात देखील अपृश्यूतंसंबंधी विवेचन आढळते. महाराष्ट्रात पिशवाईच्या काळात अस्पृश्यतेला उत आला होता पुढे 1935 मध्ये सायमन कमिशनने ,अनुसूचित जाती' (scheduled castes) ही संज्ञा वापरली, मा.गांधीजींनी 'हरिजन' असे संबोधले. डॉ. आंबेडकरांनी 'बहिष्कृत जाती' असा उल्लेख केला तर.वि.रा.शिंदेंनी त्यांना 'दलित' . तर भारतीय घटनेने 341 मध्ये या जातीची सुची दिली म्हणून आज 'अनुसुचित आती' असा शब्दप्रयोग रूढ झाला.

**उद्दिष्टे:**

1) अनु. जाती व जमातीबाबतच्या घटनेतील तरतुदीचा त्यांच्या सामाजिक जीवनावरीर परिणामांचा अभ्यास करणे
2) SC/ST च्या घटनेतील तरतुदींचा त्यांच्या आर्थिक जीवनावरील परिणाम अभ्यासणे.
3) अनु. जाती व जमातीच्या घटनेतीक तरतुदीचा त्यांच्या राजकीय जीवनातील परिणामांचा अभ्यास करणे.

**सामाजिक जीवनावरिल परिणाम**

- **आरक्षण**

घटनेने SC/ST साठी शिक्षण आणि नोक-यांमध्ये आरक्षण दिले आहे ज्यामुळे त्यांना सामाजिक दृष्ट्या अधिक संधी मिळते, समाजामध्ये समान पातळीवर आणण्याचा हा प्रयत्न यशस्वी होताना दिसत आहे,

- **सामाजिक समानता**

समाजातील सर्व घटकांना मानवतेच्या दृष्टीकोनातून एका पातळीवर आणण्याचा प्रयत्न केला आहे, कलम 15 नुसार भेदभाव केला जाणार नाही अशी घटनेने हमी दिली .या जातींना समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्याची संधी बहाल करते.

- **मानव म्हणून जगण्याचा अधिकार**

घटनेतील कलम 14 नुसार अस्पृश्यता पाळली जाणार नाही याची ग्वाही घटनेने जनतेला दिल्याने मानव जीवन जगण्याचा अधिकार मिळाला.

अथवा शुन्य व्याजदरात आर्थिक मदत इ, सुविधांमुळे अनेक व्यावसायिक क्षेत्रात त्यांची प्रगती होताना दिसत आहे.

- **जागरूकता**

घटनेतील तरतुदीच्या माध्यमातून समाजातील इतर घटकांना Sc/St विषयक गरजा आणि समस्यांची जाणीव होते.

**आर्थिक प्रभाव**

- **रोजगार**

घटनेतील कलम 16 अंतर्गत नोकरीतील समानतेमुळेSc/St लोकांना समान संधी मिळाली.
यामुळे त्यांच्या आर्थित स्थितीत सुधारणा होते.

- **शिक्षण**

आरक्षणाने शिक्षणामध्ये सवलती, शिष्यवृत्त्या मिळतात ज्यामुळे त्यांना चांगलया रोजगाराच्या संधी मिळतात.

- **व्यवसाय**

SC/ST च्या लोकांसाठी व्यवसायिक मोफत कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम, कमी

**७राजकीय प्रभाव**

- **राजकीय जागृती**

अनुसूचित जाती व जमातींच्या लोकांना राजकीय प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होण्याची संधी मिळते, ज्यामुळे राजकीय जनजागृती वाढते.

- **राजकीय प्रतिनिधीत्व**

घटनेतील आरक्षणाच्या माध्यमातून विधानसभेत व संसदेत प्रतिनिधित्व मिळवण्याची संधी मिळते, ज्यामुळे ते आपल्या समस्या आणि गरजा मांडू शकतात.

- **राजकीय निर्णय**

राजकीय प्रतिनिधीत्वामुळे राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागामुळे त्यांच्या गरजा आणि समस्यांचा विचार केला जातो.

- **राजकीय अधिकार**

राजकीय सहभागामुळे त्यांना राजकीय अधिकारांची जाणीव होते व ते आपल्या हक्कासाठी लढु शकतात

**निष्कर्ष**

अनु.जाती व जमातीच्या लोकांसाठी राज्यघटनेतील तरतुदी त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनावर सकारात्मक बदल घडताना दिसत आहे. समतेच्या दिशेने या जातीतील लोकांची वाटचाल होत आहे. घटनेत या समाजघटकांना न्याय मिळवून देशासाठी केलेल्या विशेष तरतुदीचा चांगलाच सकारात्मक परिणाम पहावयास मिळतो. अद्यापही ग्रामीण भागात काही ठीकाणी भेदभाव अस्तित्वात आहे.

**संदर्भग्रंथ :**

1) Dr. madan G.R Indian social problem vol I and II
2) भारतीय सामाजिक समस्या- प्राः एस. एन गंदेकर
3) व्हटकर नामदेव - भारतातील जातीभेद आणि त्यावरील उपाय
4) पंडित नलिनी - जातीवाद आणि वर्गवाद

5) mr.m.wikipedia org.
6) डॉ. सुधा काळदाते-भारतातील सामाजिक समस्या